स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद





रयत शिक्षण संस्थेचे,

# राधाबाई काळे महिला महाविद्यालय, अहमदनगर.

# प्रतिबिंब

डिसेंबर २०१८ ते फेब्रुवारी २०१९

विद्यार्थिनी संचलित वार्तापत्र... [ वर्ष दुसरे : अंक : ३ ]

**संपादक मंडळ**

१. कु. अर्चना भिटे - एम.एससी. केमिस्ट्री.
२. कु. कॅथरीन क्षेत्रे - एम.ए. इंग्रजी.
३. कु. रुपाली मोरे - टी.वाय. बीएस्सी.
४. कु. प्रगती मिसाळ - टी.वाय.बी.ए.
५. कु. प्रतीक्षा कड - एस.वाय.बी.कॉम.



**मार्गदर्शन**

१. डॉ. भाऊसाहेब औटी
२. डॉ. मनोहर करांडे
३. प्रा. रामचंद्र राऊत
४. डॉ. सुभाष आहेर
५. डॉ. भुपेंद्र निकाळजे

## उद्योजकता क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी कौशल्य व प्रयत्न महत्त्वाचे



उद्योजकता विकास केंद्र, श्री. सुरेश उमाप विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना.

उद्योग क्षेत्रामध्ये नवनवीन बदल होत आहेत. विद्यार्थिनींनी शिक्षण घेत असताना उद्योगातील मुलभूत गरजांचा अभ्यास करुन समाजभिमुख उपयोगी वस्तू निर्माण करुन आत्मनिर्भर व्हावे व देशसेवा करावी असे प्रतिपादन विभागीय, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र पुणे येथील श्री.सुरेश उमाप यांनी केले. राधाबाई काळे महिला महाविद्यालयात उद्योजकता विकास केंद्र व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र आयोजित उद्योजकता विकास या कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दिनानाथ पाटील होते. या कार्यक्रमास डॉ.विजय फुलारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर हे उपस्थित होते. मा. उमाप म्हणाले या क्षेत्रामध्ये तांत्रीक प्रशिक्षण, कौशल्य विकास, प्रदर्शन भेट, यशस्वी उद्योगांची आत्मचरित्रे, या माध्यमातून आपण यशस्वी उद्योजक होऊ शकतो. त्या बाबत त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ दिनानाथ पाटील म्हणाले की आपल्या क्षमता व कौशल्यांचा शोध घेऊन कृतिशील धडपड केल्यास उद्योग क्षेत्रात आपण कर्तृत्व सिद्ध करु शकतो. महाविद्यालयात शॉर्ट टर्म च्या माध्यमातून वेगवेगळी कौशल्ये विद्यार्थिनी आत्मसात करीत आहेत. त्यातून उद्योजकतेला पुढे संधी आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सचिन कुंदे यांनी केले तर आभार प्रा. अमोल बुचुडे यांनी मानले.

## भारताच्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी महिलांचे योगदान महत्त्वाचे

- प्राचार्य डॉ. प्रतिभा गायकवाड



राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये मार्गदर्शन करताना प्राचार्या डॉ. प्रतिभा गायकवाड

भारतीय अर्थव्यवस्थेला चालना देत असताना पुरुषा प्रमाणे महिला सुद्धा पूर्ण क्षमतेने काम करु शकतात महिलांना समाजव्यवस्थेमध्ये दुय्यम स्थान दिल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर त्याचे दूरगामी परिणाम दिसून येतील असे प्रतिपादन सातारा येथील धनंजय गाडगीळ महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रतिभा गायकवाड यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ नियोजन व विकास मंडळाच्या आर्थिक सहयोगातून व राधाबाई काळे महिला महाविद्यालयातील अर्थशास्त्र व वाणिज्य विषयाच्या राष्ट्रीय परिषद व भौतिकशास्त्र विषयाचे राज्यस्तरीय दोन दिवसीय चर्चासत्राच्या उद्‌घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनानाथ पाटील होते. याप्रसंगी प्रा. एन.आय. सय्यद, डॉ. भाऊसाहेब औटी, डॉ. मनोहर करांडे, डॉ. गणेश अग्निहोत्री, डॉ. एस.के व्यवहारे उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. ज्योती जाधव यांनी केले व प्रमुख पाहुण्यांची ओळख प्रा. अनिल कापरे यांनी करुन दिली.

आज महिला प्रत्येक क्षेत्रामध्ये जबाबदारीने काम करीत आहेत. विज्ञान, तंत्रज्ञान, कृषी, व्यापार, बँक, कंपनी मध्ये महिला उल्लेखनीय कार्य करीत आहेत. त्यामुळे भारताची अर्थव्यवस्था काळानुरुप प्रगतीकडे जात आहे.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. दिनानाथ पाटील म्हणाले, भारताच्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी युवतींचे योगदान महत्त्वाचे आहे. भारतीय अर्थव्यवस्थे समोर अनेक समस्या आहेत. भ्रष्टाचार, प्रशासकीय दिरंगाई, वेळेचा दुरुपयोग, काळा पैसा या समस्या व्यवस्थेतून दूर करुन सक्षम भारताची निर्मिती युवकांकडून होणे अपेक्षित आहे.

दोन दिवस चालणाऱ्या राष्ट्रीय परिषदेमध्ये वैचारिक मंथनातून नवसंशोधकांना विद्यार्थी व प्राध्यापकांना एक दिशा मिळणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुभाष आहेर व प्रा. शुभांगी ठुबे यांनी केले. आभार प्रा. निर्मला चौधरी यांनी केले.

## राधाबाई काळे महिला महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती साजरी

रयत शिक्षण संस्थेच्या राधाबाई काळे महिला महाविद्यालयात स्त्री शिक्षणाची जननी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. ज्या काळात स्त्रीला समाजात मानाचे स्थान मिळत नव्हते. शिक्षणापासून आणि स्वातंत्र्यापासून दूर ठेवून स्त्रीला परावलंबी आणि पारतंत्र्यात ठेवले जात होते त्या काळात सावित्रीबाईंचा जन्म झाला. स्वतः शिकून सावित्रीबाईंनी मुलींना शिक्षण दिले. स्त्री शिक्षणाचा पाया रचनाऱ्या अनंत अडचणींवर मात करुन मुलींसाठी पहिली शाळा सुरु करणाऱ्या पहिला महिला शिक्षिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याला विद्यार्थिनींनी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनानाथ पाटील, शिक्षक, शिक्षकेतर सेवकांनी अभिवादन केले.

## माजी विद्यार्थिनींचा मेळावा संपन्न

राधाबाई काळे महिला महाविद्यालयात शिक्षण पूर्ण करुन वेगवेगळ्या ठिकाणी आपले कर्तृत्व सिद्ध करणाऱ्या सर्व पदवी व पदवीत्तर शिक्षण पूर्ण करणाऱ्या माजी विद्यार्थिनींचा मेळावा दि. ०६ जानेवारी २०१९ रोजी सकाळी १०:३० वाजता महाविद्यालयात संपन्न झाला. मोठ्या संख्येने विविध शासकिय, निमशासकीय, व्यवसाय, घरकाम, संसार यातून वेळ काढून विद्यार्थिनी महाविद्यालयात आल्या. जशी माहेरपणाची ओढ असते तशीच ओढ विद्यार्थिनींमध्ये दिसून येत होती. आपण शिक्षण घेत असलेले महाविद्यालय कशी प्रगती करीत आहे. इमारती बरोबरच, क्रीडांगण, व गार्डन मधील छोटी झाडे आता किती मोठी झाली हे कुतूहल व आपूलकीने विद्यार्थिनी पाहत होत्या सर्वस्तरावर महाविद्यालय प्रगती करीत आहे व पुणे विद्यापीठाचे गोल्ड मेडल आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या परिश्रमाचे ते फळ आहे. महाविद्यालयातील शिक्षकांनी आदराने माजी विद्यार्थिनीचे स्वागत केले व त्यांचा सम्मान केला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनानाथ पाटील यांनी माजी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले व महाविद्यालयामध्ये पुन्हा पुन्हा येण्याचे आग्रही निमंत्रण दिले. वेगवेगळ्या पातळीवर माजी विद्यार्थिनीच्या कार्याचा गौरव या प्रसंगी करण्यात आला. डॉ. सूमन पवार, डॉ. संगिता कूलकर्णी व माजी विद्यार्थिनी सर्व पदाधिकारी यांनी महाविद्यालया बद्दल गौरव उद्गार काढले.

## विद्यार्थिनींना व्यवसायाबाबत प्रशिक्षण आयोजन - " ट्रेड फेअर "

रयत शिक्षण संस्थेच्या राधाबाई काळे महिला महाविद्यालयामध्ये ट्रेड फेअर प्रदर्शन संपन्न झाले एकूण २१० विद्यार्थिनींनी सहभाग घेऊन व्यवसायाचे धडे गिरविले. या ट्रेड फेअरचे उद्घाटन अहमदनगर विद्यूत विभागाचे अभियंता श्री. पालवे साहेब यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी प्राचार्य डॉ. दिनानाथ पाटील, डॉ. भाऊसाहेब औटी, डॉ. मनोहर करांडे, प्रा.नासिर सय्यद व वाणिज्य विभागाच्या प्रा. शुभांगी ठुबे यांच्या संयोजनाखाली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यात विद्यार्थिनींनी बनविलेले खाद्यपदार्थ ज्वेलरी, ड्रेस मटेरियल व विविध वस्तू ह्या विक्रीसाठी उपलब्ध होत्या. दिवसभरात स्टॉलवर एक लक्ष रुपयाची उलाढाल झाली. प्रा. फातेमा अंबेकर, प्रा. जयश्री पवार आदींनी नियोजन केले.

## डेअरी सायन्स शॉर्ट टर्म कोर्स



डेअरी सायन्स शॉर्ट टर्म कोर्स प्रदर्शनाला भेट देतांना प्राचार्य डॉ.दिनानाथ पाटील

राधाबाई काळे महिला महाविद्यालया मध्ये डेअरी सायन्स शॉर्ट टर्म कोर्सचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थिनींनी शिक्षणासोबत या कोर्सचे पशिक्षण घेतले. एकूण ४५ विद्यार्थिनींनी या मध्ये सहभाग नोंदविला व भविष्यामध्ये रोजगाराची संधी या मधून विद्यार्थिनींनी पाहिली. या कोर्स द्वारे विद्यार्थिनी दूधाची भेसळ व दूधापासून वेगवेगळे पदार्थ आपण कसे निर्माण करु या बाबत त्यांनी प्रशिक्षण घेतले व त्याचे प्रदर्शन भरविले. डॉ.हेमंत अकोलकर, प्राचार्य डॉ. दिनानाथ पाटील यांच्या मार्गदर्शना अंतर्गत हा कोर्स संपन्न झाला.

## सेट नेट मार्गदर्शन कार्यशाळा

राधाबाई काळे महिला महाविद्यालयामध्ये रसायनशास्त्र विभागाअंतर्गत विद्यार्थिनीसाठी सेट, नेट मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन केले होते या कार्यशाळेमध्ये एकूण 45 विज्ञान शाखेतील विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला होता. सेट व नेट परीक्षेमध्यो वेळोवेळी प्रश्नपत्रिका स्वरुप व अभ्यासक्रमामध्ये होणारे बदल लक्षात घेऊन या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

दि. १ डिसेंबर २०१८ ते ०८ डिसेंबर २०१८ या कालावधी मध्ये या कार्यशाळेचे आयोजन केले गेले. या कार्यशाळेमध्ये प्राचार्य. डॉ. दिनानाथ पाटील, डॉ. हेमंत अकोलकर, प्रा.सचिन कुंदे, प्रा.निर्मला दरेकर, प्रा.डॉ.रुपाली एंडाइत, प्रा.रमेश कवळे यांनी या कार्यशाळेमध्ये विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

## भूगोल विषयाच्या अभ्यासाने व्यक्तिमत्त्व चौफेर होते -प्रा. डॉ. माया उंडे

राधाबाई काळे महाविद्यालया मध्ये ७ फेब्रुवारी २०१९ या दिवशी भूगोल दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी अहमदनगर महाविद्यालयाच्या भूगोल विभाग प्रमुख प्रा.डॉ. माया उंडे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कला शाखा विभागाचे प्रमुख डॉ. मनोहर करांडे हे होते.

भूगोल विषयाचे स्वरुप हे आंतरविद्याशाखीय आहे, त्यामुळे भूगोल विषयाच्या अभ्यासाने व्यक्तिमत्त्व चौफेर होते, असे प्रतिपादन त्यांनी केले. तसेच भूगोल विषयातील विविध संधी याबद्दल देखील माहिती दिली. आपल्या अध्यक्षीय मनोगतामधून भूगोल आणि दैनंदिन जीवनातील सर्व गोष्टींचा संबंध कसा आहे हे सोदाहरण सांगितले. भूगोल दिनाच्या निमित्ताने विभागात पर्यावरण विषयक रांगोळी स्पर्धा आणि नकाशांचे प्रदर्शन भरविण्यात आले. स्पर्धेतील विजेत्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली. तसेच गावचा भूगोल या हस्तलिखिताचे प्रकाशन देखील मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक भूगोल विभाग प्रमुख डॉ. रविप्रकाश ठोंबरे यांनी केले, तर आभार प्रा. गणेश जाधव यांनी मानले आणि कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सचिन कोतकर यांनी केले.

## विद्यापीठ पारितोषिक "माई " अंकास




सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ नियतकालिक (२०१६-१७) चे विद्यापीठ स्तरीय चतुर्थ क्रमांकाचे पारितोषिक स्विकारताना प्राचार्य डॉ.दिनानाथ पाटील

## इंडियन बँकेला भेट

राधाबाई काळे महिला महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागातील विद्यार्थिनींनी अहमदनगर गुलमोहर रोड येथील इंडियन बँक या शाखेला भेट दिली व त्यामध्ये २१ विद्यार्थिनींनी के.वाय.सी. बाबत शाखा व्यवस्थापक यांच्याशी बँकेचे व्यवहार कशा पद्धती चालतो, व बँकेची कामकाज पद्धती कर्ज वितरन व्यवस्था, व्याज आकारण्याची पद्धत, खातेदाराच्या खाते पुस्तका वरील विविध नोंदी, कशा पद्धतीने आकारल्या जातात व त्याच बरोबर ग्राहकांना आकर्षीत करण्यासाठी बँकेच्या कोणकोणत्या योजना असतात. खातेदाराने कर्ज घेतल्या नंतर मंजुरीची प्रक्रियाबाबत विद्यार्थिनींनी कागदपत्रा बाबत माहिती घेतली. अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. ज्योती जाधव व प्रा. जगदीश साबळे यांनी यांचे नियोजन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनानाथ पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

## आर्थिक व सामाजिक सर्वेक्षण जेऊर (बा)

राधाबाई काळे महिला महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागातील विद्यार्थिनी दि. २३.२.२०१९ रोजी जेऊर (बा) ता. जि. अहमदनगर या ठिकाणी जाऊन गावपातळीवर आर्थिक व सामाजिक सर्वेक्षण केले व गावामध्ये आर्थिक स्त्रोत व सामाजिक संरचना बाबत विद्यार्थिनींनी माहिती घेतली या आर्थिक व सामाजिक सर्वेक्षणासाठी अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. ज्योती जाधव यांचे सहकार्य लाभले.

## समाजाची जडण - घडण ज्ञानाच्या माध्यमातून होत असते - प्राचार्य डॉ. ज्ञानदेव म्हस्के



ज्ञानसंपादनाने माणूस अज्ञानाकडून ज्ञानाकडे व ज्ञानाकडून विज्ञानतंत्रज्ञानाकडे जात असतो व समाजामध्ये जबाबदारीने काम करण्याची क्षमता पदवी प्राप्त केल्यामुळे निर्माण होते. पदवीप्राप्त विद्यार्थिनींनी राष्ट्राच्या विकासामध्ये आपले योगदान द्यावे असे प्रतिपादन महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय, श्रीगोंदा चे प्राचार्य डॉ. ज्ञानदेव म्हस्के यांनी केले.अहमदनगर येथील राधाबाई काळे महिला महाविद्यालयात पदवीग्रहण समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनानाथ पाटील होते. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब औटी, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य मा. श्री. अशोक बाबर, मा. श्री. ज्ञानदेव पांडुळे, परीक्षा विभागप्रमुख प्रा. अनिल कपरे, परीक्षा अधिकारी डॉ. संतोष गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. सहदेव आव्हाड, डॉ. सौ. संगिता कुलकर्णी, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. भुपेंद्र निकाळजे, क्रीडा संचालक डॉ विजय म्हस्के, प्रा. नासिर सय्यद उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. मनोहर करांडे यांनी केले. या वेळी डॉ. म्हस्के म्हणाले हिऱ्याला जसे अनेक पैलू असतात तशी त्यांची किंमत ठरते. मानवामध्ये ज्ञानाचे पैलू हे महत्त्वाचे ठरतात. मानवाने ज्ञानप्राप्तीची लालसा ही आपल्यामध्ये ठेवली पाहिजे व भविष्यामध्ये समाजोपयोगी संशोधनाकडे आपणाकडून व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ.दिनानाथ पाटील म्हणाले जगाच्या पाठीवर नालंदा व तक्षशीला हे ज्ञानमंदिरे भारताची ओळख होती. आज मंदिराकडून ज्ञानमंदिराच्या पायरीवर जाणे अधिक महत्त्वाचे झाले पाहिजे. ज्ञानामध्ये अंधश्रद्धेची शृंखला तोडण्याची क्षमता आहे. मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग समाजासाठी व देशासाठी करावा असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुभाष आहेर व पल्लवी देवकर यांनी केले. आभार डॉ. संतोष गायकवाड यांनी मानले.

## संशोधन आणि विज्ञानाच्या विवेकी वापराने मानवी जीवन प्रगतीकडे जात आहे.



विज्ञान दिनानिमित्त डॉ.प्रविण जाधव यांचा सन्मान करतांना प्राचार्य डॉ.दिनानाथ पाटील

विज्ञान समाजातील गरजांमधून संशोधन करीत असते वैदिक गणितातील संशोधनामुळे आपले जीवन सुसह्य झाले आहे. संशोधन आणि विज्ञानाच्या विवेकी वापराने मानवी जीवन प्रगतीकडे जात आहे. डॉ.सी.व्ही.रामण यांच्या (रामन परिणाम) या संशोधनामुळे त्यांना नोबल पारितोषिक मिळाले म्हणून हा दिवस राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. असे प्रतिपादन डॉ. प्रविण जाधव, बाळासाहेब जाधव, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आळे ता.जुन्नर जि. पूणे यांनी केले.

राधाबाई काळे महिला महाविद्यालया मध्ये राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालया मध्ये प्राचार्य डॉ. दिनानाथ पाटील होते. या प्रसंगी डॉ. भाऊसाहेब औटी, प्रा. ए.के. कापरे, प्रा. जयदिप नरवडे, प्रा. आर.झेड. शेख, प्रा. महेश आवारे उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा.नासिर सय्यद यांनी केले.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. दिनानाथ पाटील म्हणाले रासायनिक संयुगाची रचना ठरविण्यामध्ये रामन परिमाणाची मोलाची मदत झाली. अनेक रासायनिक संयुगांची रचना निश्चित करणे शक्य झाले. चमत्कार करणारे बदमाश असतात हे डॉ.अब्राहम कोवुर यांचे प्रसिद्ध वाक्य सांगून ते म्हणाले विज्ञानाला दुय्यम स्थान दिल्याने जगाला तंत्रज्ञान देण्याऐवजी पाश्चांत्यावर आपल्याला विसंबू रहावे लागत आहे. आज युवा पिढीकडून नवीन संशोधनाची नितांत आवश्यकता आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. मयुरी काळदाते आभार व कु. गीतांजली बेंद्रे यांनी मानले.

## पालक मेळावा

वरिष्ठ महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींच्या पालकांचा मेळावा 06 जानेवारी 2019 रोजी सकाळी 10.30

आयोजित करण्यात आला. महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थिनींचे पालक मोठ्या संख्येने महाविद्यालयात आले होते. आपली पाल्य शिक्षण घेत असलेले महाविद्यालय कोणकोणत्या सोई व सवलती देते व महाविद्यालयातील सुरक्षितता पाहून पालक समाधानी झाले. पिण्याच्या पाण्यासाठी एक प्रकल्प महाविद्यालयाने उभा केला आहे. विद्यार्थिनींसाठी वेगवेगळी वैज्ञानिक उपकरणे सुसज्ज प्रयोगशाळा, इन्टरनेट ची सुविधा, कँन्टीन मधील व्यवस्था व स्वच्छता, तत्परता, महाविद्यालयातील मेस व त्याची स्वच्छता, माफक पैशामध्ये भोजनाची सोय, कचरा व्यवस्थापन, बायोगॅस एक प्रकल्प, कंम्पोस्ट खत प्रकल्प, सौर उर्जा प्रकल्प, भाषा प्रयोगशाळा, संपूर्ण परिसर सी.सी.टी.व्ही., महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी परिसरामध्ये वायफाय सेवा, विविध शॉट टर्म कोर्स सुद्धा महाविद्यालयात होतात. हे सर्व पाहून पालकांमध्ये समाधान याप्रसंगी दिसत होते. व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनानाथ पाटील पालकांना विद्यार्थिनीच्या उज्ज्वल भविष्यासाठी महाविद्यालय पुढे काय करीत आहे ह्या बाबत माहिती देत होते व पालकांच्या अपेक्षा सुद्धा जाणून घेत होते. प्रा. डॉ. मनोहर करांडे व प्रा. संभाजी कातोरे प्रत्येक पालकांचे स्वागत करीत होते. विद्यार्थिनीची प्रगती व महाविद्यालयातील सुविधा पाहून पालकां मध्ये समाधान या प्रसंगी दिसत होते.

## मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त व्हावा. -प्रा. मेघा काळे

मराठी भाषेचे संवर्धन करणे आपल्याच हातात आहे. मराठी भाषेवर आजवर अनेक आक्रमणे झाली. तरी देखील मराठी भाषा टिकून आहे व ती उन्नत झालेली दिसते. अभिजात भाषेचा दर्जा तिला प्राप्त होण्यासाठी आवश्यक असलेले लोकसंख्या, कालखंड, आणि इतर भाषांशी असलेले सख्य यासारखे निकष तिने पूर्ण केले आहेत. लवकरच मराठीला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त होईल. असा विश्वास प्रा. मेधा काळे यांनी व्यक्त केला.

राधाबाई काळे महिला महाविद्यालयातील मराठी विभागाद्वारे आयोजित मराठी राजभाषा गौरव दिन प्रसंगी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य मा. विश्वासराव काळे होते. भाषेच्या संवर्धनासाठी प्रत्येकाने व्यक्तीगतरित्या भाषेची काळजी घ्यावी असे प्रतिपादन त्यांनी अध्यक्षीय मनोगतातून केले. मराठीचा सुवर्ण अक्षरांनी लिहिलेल्या इतिहासाशी नगर जिल्ह्याचा संबंध आहे. ज्ञानेश्वरीची निर्मीती, नाथ संप्रदाय, महानुभाव संप्रदाय आदी संप्रदायांचा विकास आणि प्रसार नगर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात झाला. तसेच मराठीतील प्रसिद्ध साहित्यिकांची नाळ अहमदनगरशी जोडलेली आहे. असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनानाथ पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्रा. सचिन कोतकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. रविप्रकाश ठोंबरे यांनी केले.तसेच आभार प्रदर्शन प्रा. दशरथ शेळके यांनी केले. मराठी दिनाचे औचित्य साधून भित्तीपत्रकांचे प्रदर्शनही महाविद्यालयात आयोजन करण्यात आले होते.

## राधाबाई काळे महिला महाविद्यालयात वस्तू संग्रहालय उभारणी

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी समाजाच्या तळागाळातील घटकापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचावी म्हणून रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. अल्पावधीतच या संस्थेचा राज्यभर प्रसार होऊन आज अनेक शाखा निर्माण झाल्या. अहमदनगर जिल्ह्यात या संस्थेचे कार्य नेटाने पुढे नेण्याचे काम मान. स्वर्गीय शंकरराव काळे साहेब यांनी केले. तत्कालीन मुख्यमंत्री व संस्थेचे माननीय अध्यक्ष मा. शरदरावजी पवार साहेब यांनी उच्च शिक्षणातील महिलांचे प्रमाण वाढावे म्हणून नव्याने महिला महाविद्यालय सुरु करण्याचे धोरण अवलंबिले. या हेतूने प्रेरित होऊन जिल्ह्याच्या ठिकाणी मुलींना उच्च शिक्षण देणारे महिला महाविद्यालय असावे असे मा. स्वर्गीय शंकरराव काळे साहेबांना वाटू लागले. १९८९ साली मातोश्री राधाबाई काळे यांच्या नावाने रयत शिक्षण संस्थेचे महिला महाविद्यालय सुरु केले. हे महाविद्यालय विद्यार्थिनींचा सर्वांगीण विकास साधत उत्तरोत्तर प्रगती करत आहे. आज आपणास आवाहन करतांना आम्हास आनंद होत आहे की, या महाविद्यालयात स्वर्गीय शंकररावजी काळे वस्तू संग्रहालय व संशोधन केंद्र स्थापन होत आहे. त्याद्वारे संशोधकांना, अभ्यासकांना व विद्यार्थिनींना संशोधनसाधने उपलब्ध करुन देता येतील. हे संग्रहालय सर्व प्रकारच्या ऐतिहासिक वस्तू आणि दस्तऐवज यांनी समृद्ध व्हावे, जिल्ह्याचे भूषण ठरावे अशी मनिषा आहे. त्यामुळे आम्ही जिल्ह्यातील तमाम नागरिकांना, विद्यार्थिनींना आवाहन करतो की आपल्याकडे अशा अनेक वस्तू आहेत की, ज्या कालबाह्य झाल्या आहेत गरात अडगळीच्या ठरत आहे. परंतु ऐतिहासिक दृष्टिकोनातून अशा वस्तू आणि दस्तऐवज अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्या आमच्या संग्रहालयास भेट दिल्यास आम्ही त्याचे काळजीपूर्वक जतन करु. त्यामुळे त्या वस्तूसह आपले नाव अजरामर होईल. तरी कृपया अशा वस्तू संग्रहालयास भेट देऊन या कार्यास हातभार लावावा. त्यामुळे आपल्या गावाचा, तालुक्याचा, जिल्ह्याचा इतिहास जतन आणि संवर्धन होण्यास मदत होईल. तसेच विद्यार्थी व नागरिकांना त्याची माहिती होईल. परिणामी आपल्या संस्कृतीचे जतन होऊन संवर्धन होईल. इतिहासाच्या संशोधकांना संशोधन व इतिहास लेखन करण्यासाठी अव्वल दर्जाचे साधन म्हणून त्याचा उपयोग होईल. तेव्हा आपल्याजवळील हा मौल्यवान ठेवा नामशेष होण्यापेक्षा संग्रहालयाला दिल्यास त्याचा निश्चितच सर्वांना उपयोग होईल. तेव्हा पुन्हा एकदा महाविद्यालयाच्या वतीने विनम्रपणे आग्रहाचे व कळकळीचे जाहीर आवाहन करीत आहोत.

अधिक संपर्कासाठी राधाबाई काळे महिला महाविद्यालय कार्यालय, प्रा. अमोल बुचुडे मोबाईल नं. ९९७५५०१३९६ यांच्याशी संपर्क साधावा

## भूईकोट किल्ला भेट

राधाबाई काळे महिला महाविद्यालयातील इतिहास विभागा अंतर्गत भूईकोट किल्ला या ठिकाणी भेट देण्यात आली व ऐतिहासिक दृष्टिकोनातून भूईकोट किल्ला व स्वतंत्रता आंदोलन या विषयी विद्यार्थिनींना इतिहास विभाग प्रमुख प्रा. गफूर शेख यांनी मार्गदर्शन केले व संपूर्ण किल्ला व स्वतंत्रता आंदोलन मध्ये बंदी केलेल्या थोर महापुरुषांचे देश सेवेतील योगदाना बद्दल ते माहिती देत होते या भेटी मध्ये प्रा. अमोल बुचूडे, प्रा. गणेश जाधव, डॉ. भूपेंद्र निकाळजे सहभागी झाले होते.

## राष्ट्रीय सेवा योजना - समर्थ भारत अभियान



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना व राधाबाई काळे महिला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्त समर्थ भारत अभियान आणि सक्षम युवा समर्थ भारत या उपक्रमांतर्गत विशेष श्रमसंस्कार शिबीर डोंगरगण ता.जि. अहमदनगर या ठिकाणी दि. १४ चे २० डिसेंबर २०१८ या कालावधी मध्ये घेण्यात आले. या शिबीरामध्ये एकूण १२० विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.

## भारत हा तरुणांचा आणि उत्साहाचा देश आहे - मा. अरविंद पारगांवकर

जगामध्ये उत्कृष्ट कार्य करण्याची क्षमता भारतीयांमध्ये आहे. या महाविद्यालयातील तरुणाईचा उत्साह पाहून जगामध्ये आपला देश हा उत्साही तरुणांचा देश म्हणून ओळख निर्माण करीत आहे. या उत्साहातून नवनिर्मितीही होत असते. विद्यार्थिनींची क्रीडा, सांस्कृतिक, शैक्षणिक पातळीवर यशस्विता पाहून याची प्रचिती आली. असे प्रतिपादन लार्सन अॅण्ड टुब्रो अहमदनगरचे जनरल मॅनेजर मा. श्री. अरविंद पारगांवकर यांनी केले. अहमदनगर येथील राधाबाई काळे महिला महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेच्या भिंगार हायस्कूल येथील स्थानिक सल्लागार सामितीच्या अध्यक्षा मा. रितुताई अॅबट होत्या.



वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात मार्गदर्शन करतांना मा.अरविंद पारगांवकर

या प्रसंगी उत्तर विभागाचे अध्यक्ष मा. आ. दादाभाऊ कळमकर, मा. अशोक बाबर, मा. ज्ञानदेव पांडुळे, मा. प्राचार्य विश्वासराव काळे, इंजिनिअर अनिल साळुंखे, मा. संभाजी शेंडकर उपस्थित होते. प्रास्ताविक करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनानाथ पाटील म्हणाले की अहमदनगर शहरामध्ये रचनात्मक व गुणात्मक दोन्ही पातळीवर महाविद्यालय स्वत:ची वेगळी ओळख निर्माण करत आहे व काळानुरुप महाविद्यालय प्रगतीची झेप घेत आहे. याप्रसंगी गरजू विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र निधी सुरु करुन त्यांनी २५ हजार रुपयांची देणगी महाविद्यालयास दिली. उत्तर विभागाचे अध्यक्ष मा.आ.दादाभाऊ कळमकर यांनी रयत शिक्षण संस्थेच्या शताब्दी वर्षानिमित्त संस्थेची यशस्वी वाटचाल याबाबत आपले विचार व्यक्त केले.मा. पारगावकर पुढे म्हणाले आज विद्यार्थिनींनी ठराविक क्षेत्राकडे न जाता संशोधन, प्रशासकीय सेवा, विज्ञान तंत्रज्ञान, कृषी, व्यापार, बँक, पर्यटन व भाषा कौशल्य आत्मसात करुन रोजगाराच्या संधीचा फायदा घ्यावा व भारताच्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी युवतींचे योगदान मोलाचे ठरणार आहे. त्यासाठी आत्मविश्वास, इच्छाशक्ती, सकारात्मकता, क्रियाशिलता व मनन करण्याची क्षमता आपल्यामध्ये निर्माण करावी असे ते म्हणाले.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना मा.रितु अॅबट म्हणाल्या की, युवतीमध्ये विनयशीलता व क्रियाशिलता हे स्त्रीशक्तीचे आत्मतत्व आहे ही ओळख प्रत्येकीने जपली पाहिजे. आज प्रत्येक क्षेत्रामध्ये स्त्री जबाबादारीने कार्य करीत आहे. याप्रसंगी महाविद्यालयातील क्रीडा, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रातील यशस्वी विद्यार्थिनींचा सन्मान करण्यात आला. उत्कृष्ट सेवक म्हणून प्रा. नासिर सय्यद, डॉ. सुभाष आहेर, डॉ. भुपेंद्र निकाळजे, श्री. संतोष चव्हाण यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुभाष आहेर व प्रा.पल्लवी देवकर यांनी केले. आभार डॉ. भाऊसाहेब औटी यांनी मानले.

## लोकधर्मी साहित्यिक-मा. नामवर सिंह

श्री. नामवर सिंह हे एक साहित्यिक व समीक्षक होते. त्यांचा जन्म एका खेड्यात झाला. हिंदी साहित्याच्या विशाल क्षेत्रात सात दशकं अधिराज्य केले. नामवर सिंह यांचे १९ फेब्रुवारी २०१९ मध्ये निधन झाले.

आ. रामचंद्र शुक्ल, आचार्य हजारी प्रसाद द्विवेदी, डॉ. रामविलास शर्मा यांच्या परंपरेतील एक लोकप्रिय समीक्षक नामवर सिंह होते. नामवर सिंह यांनी हिंदी समीक्षेला संपन्न केले. नामवर सिंह यांचे वाचन अफाट होते. नामवर सिंह उत्तम साहित्यिक व उत्तम संशोधक होते. उत्तम प्राध्यापक होते. उत्तम भाषा वैज्ञानिक होते. उत्तम संपादक होते. नामवर सिंह हे एक प्रभावी वक्ते होते. नामवर सिंह हे अत्यंत साधे होते.

नामवर सिंहाचा जन्म २८ जुलै १९२६ मध्ये बनारस जिल्ह्यातील जियनपूर नावाच्या एका खेड्यात झाला. त्यांचे शिक्षण जन्मगावी झाले. पीएच.डी उच्च शिक्षण पूर्ण केल्यावर. पुढे ते बनारस विद्यापीठात प्राध्यापक झाले. कम्युनिस्ट पक्षाच्या तिकीटावर लोकसभेची निवडणूक त्यांनी लढवली. अनेक कारणांमुळे त्यांनी आपली नोकरी घालवली. त्यांनी समीक्षेची भाषा बदलून हिंदी समीक्षेला एक नवे वळण दिले. काही काळानंतर ते दिल्लीच्या जवाहरलाल नेहरु विद्यापीठात प्राध्यापक झाले. त्यांनी हिंदी विभागाला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा मिळवून दिली. आलोचना या वाङ्मयीन नियतकालिकेचं त्यांनी संपादन केले.

नामवर सिंह हे शालेय दशेपासून कविता लिहीत. इंटरच्या परिक्षेत एकाच प्रश्नाचं उत्तर फार वेळ लिहिल्यामुळे मी नापास झालो. त्यानंतर मी वर्गात पहिला येत राहिलो असे ते म्हणाले. हजारी प्रसाद बद्दल त्यांना प्रचंड आदर होता. त्यांनी 'हिंदी के विकास मे अपभ्रंश का योगदान' हा प्रबंध लिहिला.

नामवरनी तरुण वयात बरीच वर्षं बेकारीत आणि हलाखीत काढली. छायावाद, दुसरी परंपरा की खोज हे पुस्तक त्यांनी

दिवसांत लिहिले. कविता के नये प्रतिमान हे पुस्तक 21 दिवसांत लिहिलं. त्यांनी अनेक ठिकाणी व्याख्याने दिली. नामवर सिंहांचे सगळे लेखन वादविवादावर होते. त्यांच्या मते वादविवादाशिवाय संवादाला अर्थच नाही. ते शत्रू निर्माण करण्याच्या कलेत पारंगत होते. ते शत्रुशिवाय राहुच शकत नव्हते. नामवर सिंह यांच्या मते हिंदीतील पहिली कथा निर्मल वर्मा यांची 'परींदे' ही आहे.

नामवर सिंह यांच्यावर विष्णु खरेंनी टिका केली. परंतु त्यांनी त्यांच्यावर कवितांची मुक्तकंठाने प्रशंसा केली. नामवर सिंह हे हिंदीचे लेखक जरी असले तरी त्यांना मराठीत रस होता. नागपूरला 2007 मध्ये भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते उद्घाटक होते. नामवरजींना अनेक राष्ट्रीय पुरस्कार मिळाले होते. वर्ध्याच्या महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाचे कुलपती होते. राजा राम मोहन रॉय फाऊंडेशनचे ते अध्यक्ष होते. असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते.

- कु. सरिता फरताळे

एस.वाय.बी.ए.

## माझे मऱ्हाठाचि बोलु कौतुके

मराठी भाषा असे धन्य धन्य
बोलती जयांचे भाळी असे पुण्य
कानी पडते असे हे बोल
तो महाराष्ट्र प्रांत असे थोर

संत वाङ्मयाचा साठा असणारी व साहित्याच्या विविध रचनेने नटलेली अशी मराठी भाषा आहे. 12 व्या शतकापासून ते आजतागायत मराठीची थोरवी सांगणारे अनेक संत व साहित्यिक होऊन गेले. यामध्ये अमृताबरोबर मराठीची पैज लावली तर मराठीच जिंकेल. असा विश्वास असलेले संत ज्ञानेश्वर, मराठी या मायबोलीची कीर्ती वाढत जाईल व मराठीच शून्यातून क्रांती घडवून आणेल असे सूचित करणारे ना.गो. नांदापूरकर, मराठी भाषेचा गोडवा मनाला मोहून टाकतो. ही मायबोली मुजऱ्याची मानकरी आहे. असे कृतज्ञतापूर्वक मत मांडणारे वि.म.कुलकर्णी, मराठी भाषा बोलतोय याचा अभिमान आहे कारण प्रत्येक चराचरात मराठी आहे असा कल्पनाविस्तार आपल्या कवितेतून करणारे सुरेश भट. तसेच 19 व्या शतकातील मराठीची स्थिती पाहून आपली मायबोली जरी आज राजभाषा नसली तरी भविष्यात मराठीला वैभव प्राप्त होईल. मराठीला यश मिळण्याची दिव्य आशा बाळगणारे कवी माधव जूलियन यांसारख्या अनेकांचा समावेश होतो. मराठीविषयी अभिमान व प्रेम व्यक्त करणाऱ्या त्यांच्या कविता आहेत. त्यांच्या लेखनामुळे मराठी फुलली, बहरली, रसाळ आणि माधूर्याने ओतप्रोत अशी बनली. मराठीत ज्ञानेश्वरी या विश्वकाव्याची निर्मिती झाली. संत ज्ञानेश्वरांनी मराठीचा आध्यात्मिक लोकशाही निर्माण केली. सर्व सामान्यांपर्यंत ज्ञानाचा प्रसार करावयाचा असेल तर संस्कृत भाषा उपयोगी ठरणार नाही हे जाणून मराठीचे महत्त्व त्यांनी पटवून दिले.

महाराष्ट्र राज्यात दर बारा मैलांवर भाषा बदलते असे म्हणतात. त्याप्रमाणे प्रत्येक बारा मैलांवर मराठी आपले अनोखे आणि लोभस रुप दाखवते. तिचा गोडवा गावा गावानुसार बदलत जातो. अनेक बोली, उपबोलींचा संग्रह मराठीकडे आहे. भाषेचे उच्चार बदलले तरी विचार मात्र एकच असतो. मराठी चा दरवाजा नवनवीन बदलांना स्विकारायला कायम उघडा असतो. इंग्रजीच्या प्रभावामुळे मराठी भाषा मागे पडत आहे असा दावा अनेकदा केला जातो. मात्र अनेक भाषांचा संगम होऊनही मराठीचा गोडवा कमी झालेला नाही. कोणतेही आव्हान पेलण्यास ती सशक्त आहे.

१८-१९ व्या शतकात अग्रेसर असलेले कीर्तने, भारुडे, आज २१ व्या शतकातही त्यांचे स्थान टिकवून आहेत. त्यावरून मराठीची मुळे किती खोलवर रुतली आहेत ते कळते. म्हणूनच,

माझ्या मराठीची गोडी मला वाटते अवीट,
माझ्या मराठीचा छंद मना नित्य मोहवित

या वि.म.कुलकर्णी यांच्या कवितेतील ओळी खरोखरच मराठीला साजेशा आणि समर्पक आहेत.

-कु.गितांजली खाडे टी.वाय.बी.ए.

## शेतकरी जीवन एक संघर्ष

आज दिवसेंदिवस बेकारीत वाढ होत आहे. महागाई वाढत जात आहे आणि त्याचा परिणाम गरीब लोकांवर जास्त प्रमाणात होत आहे. तरीही देखील ग्रामीण भागातील शेतकरी वर्गावर याचा परिणाम जास्त प्रमाणात दिसून येत आहे. आठ दिवसांपूर्वीचीच घटना आहे. कळमेश्वर तालूक्यात एका शेतकरी कुटुंबातील मोठ्या भावाने लहान भावाला कुऱ्हाडीने वार करुन ठार मारले. त्याचे मूळ कारण असे होते की, त्या दोघांच्या नावावर शेती होती त्या शेतीचे पैसे कुणाच्या खात्यात जमा करायचा हा प्रश्न निर्माण झाला आहे. यावरुन दोघांत वाद झाला आणि त्यात एकाला जीव गमवावा लागला. आज गरिबी असल्याने फक्त पैशांसाठी एक भाऊ दुसऱ्या भावाचा खून करतो.

सध्याच्या परिस्थितीत पाहिले तर शेतकरी हा जास्त प्रमाणात आत्महत्या करतो. आत्महत्या करण्यामागचे कारण फक्त गरिबी आहे. आणि याचा परिणाम कुटुंबावर होतो. कुटुंब उद्ध्वस्त होते. त्या कुटुंबाला आर्थिक मदत केली जाते. परंतु त्या मदतीचा काय फायदा. जेव्हा माणूस जिवंत असतो तेव्हा कोणीही त्याला मदत करीत नाही.आजही देशातील 50 टक्के पेक्षा जास्त लोक ग्रामीण भागात राहतात आणि कृषिव्यवस्था ही देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे असे आपण अभिमानाने म्हणतो. आता काही दिवसांपूर्वीची घटना आहे. गेली चार वर्षे शेतकऱ्यांनी विदर्भात संत्र्यांच्या बागा मोठ्या मेहनतीने फुलवल्या. यावर्षी पीकही भरघोस आले. परंतु बाजारात संत्र्याला भावच मिळाला नाही. 13 रुपये किलो ने संत्री विकली जात आहे. अलिकडच्या काळात शेतकऱ्यांच्या बाबतीत हे सतत घडत आहे. आधिचा तोटा विसरुन तो नव्या हंगामात नव्या जोमाने पैशांची जुळवाजुळव करतो. शेतीतून मिळणारे उत्पादन हीच त्याची संपत्ती. शेतीतून दोन वेळचे पोट भरते. उदरनिर्वाहाचा प्रश्न मिटतो. परंतु कुटुंबाच्या प्रगतीचे काय? शेती अशीच दगा देत राहिली तर ती कशी साधायची? या प्रश्नांनी शेतकरी हा हैराण झाला आहे. मानसिक ताणतणावामुळे तो आत्महत्या करण्याचा विचार करतो. या नैराश्याचा संबंध त्यांच्या मानसिक व शारीरिक आरोग्याशी जोडला जातो..

ग्रामीण भागात इतकी भयावह परिस्थिती असुनही त्याकडे कोणाचे फारसे लक्ष नाही. घोषणा होतात. प्रत्यक्षात मात्र फारशी मदत होत नाही. अशी भावना ग्रामीण भागात घट्टपणे रुजलेली दिसते. शेतकरी हा समाजातील अत्यंत मागासलेला घटक मानला जातो. वेळोवेळी आर्थिक मदतीच्या घोषणा होतात, परंतु ती मदत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचायला अनेकदा खूप उशीर होतो. कधी कधी घोषणेची पूर्तताच होत नाही. उदा. द्यायचे झाले तर तुरीवर क्विंटलमागे हजार रुपये मिळणार . या घोषणेची अशीच वाट लागली. ग्रामीण भागात शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या की कर्जमाफी. सन्मान योजनेसारख्या तात्पुरत्या उपाययोजना करायच्या पण संपूर्ण ग्रामीण व्यवस्थेकडे लक्ष द्यायचे नाही हे धोरण असे सुरु राहिले तर भविष्यात परिस्थिती आणखीनच चिघळेल. ग्रामीण समाजजीवनाची ही अतिशय वाईट व विदारक अवस्था बघून आपलेच काही चुकतेय काय असा प्रश्न पडतो. शेतकऱ्यांसाठी योग्य त्या उपाययोजना कराव्यात, ती वेळ आज आली आहे.

-अल्फीया शेख

एस.वाय.बी.ए

## राजर्षि शाहु महाराज

शुद्रातिशुद्रांच्या प्राथमिक शिक्षणाच्या बिकट प्रश्नास हात घालणारा पहिला पुरुष म्हणजे महात्मा फुले व त्यांच्यानंतर दुसरा पुरुष म्हणजे शाहू महाराज होय. शाहू महाराजांकडे सत्ता होती, साधनसंपत्ती होती आणि सर्वात म्हणजे त्यांच्याजवळ शुद्रातिशुद्रांच्या उद्धाराची तळमळ व इच्छाशक्ती होती. शाहू महाराजांनी आपल्या प्रजाजनांसाठी उच्च शिक्षणाचे पंचपक्वानाचे ताट नको होते. त्यांना त्यांच्यासाठी साधी कोंड्याची भाकर द्यायची होती.

**No cake to a few untill all are served with bread.**

हे त्यांचे तत्त्व होते. या तत्त्वास अनुसरुन त्यांनी प्राथमिक शिक्षणाचा पुरस्कार केला. एवढेच नव्हे तर त्यांनी आपल्या संस्थानात सक्तीच्या मोफत शिक्षणाचा कायदा केला आणि कसोशीने त्याची अंमलबजावणी केली.

हिदुस्थानातील प्रजेला प्राथमिक शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे प्रतिपादन करताना शाहु छत्रपती म्हटले, शिक्षण हाच आमचा तरणोपाय आहे. असे माझे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही, असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मत्सुद्दी व लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत म्हणूनच सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची हिंदुस्तानाला अत्यंत आवश्यकता आहे. शिक्षण म्हणजे केवळ मुळाक्षरांची तोंडओळख नव्हे, शिक्षणाने माणूस शहाणा झाला पाहिजे. असे त्याचे मत होते. शिक्षण हे एक साधन आहे. साध्य नव्हे. दुःखाच्या दुष्टचक्रातून सुटका करुन घेण्याचे शिक्षण हे प्रभावी साधन आहे. सर्व लोकांच्या भल्यासाठी उपयोगी पडणारे ज्ञान मिळवणे हेच खऱ्या शिक्षणाचे महत्त्व आहे.

पुस्तकी ज्ञानाला अनुभवाची जोड जोपर्यंत मिळत नाही तोपर्यंत माणूस पूर्ण होऊ शकत नाही असे शाहू महाराज म्हणत. गुरुविषयी बोलताना ते म्हणत, पूर्वजांचा इतिहास व स्वानुभाव हेच माझे गुरु होत. शिक्षण म्हणजे जीवन. जीवन म्हणजे शिक्षण. जीवन सुरु झाले की शिक्षणही सुरु होते. जीवन नदीच्या प्रवाहासारखे असते. शिक्षणही तसेच प्रवाहमय असते. जीवन आणि शिक्षणाचा संबंध अतूट असतो. शिक्षण ही अखंड चाललेली गतिमान प्रक्रिया असते.

शिक्षणाला फक्त विचारांचा आधार असेल तर ते पांगळे होईल. त्या विचारांना जर कृतीचा आधार असेल तर ते डोळस होईल. कृतीमुळे विचाराला अर्थ प्राप्त होईल. शिक्षणातून फक्त बोलघेवडे पंडित तयार झाले तर ते इतरांचे गळे कापून जगत राहतील. शिक्षणामुळे डोळसपणा येतो, जाणतेपणा येतो. जाणता माणूस निर्माण करणे हेच शिक्षणाचे खरे काम आहे.

शाहू महाराज, महाराज असले तरी महाराजांच्या थाटात कधी वावरले नाहीत. त्यांनी 1917 खामगाव परिषदेत म्हटले होते, मला शेतकरी म्हणा, कामगार म्हणा नाहीतर शिपाई म्हणा, मला त्यात आनंदच आहे. साधे राहणे, बोलणे, चालणे, हसणे याचा निखळ आनंद लुटत होते. शाहू महाराज त्यामुळेच लोकआदरास व लोकप्रियतेस पात्र ठरले.

जन्माने जातीचा मळवट कपाळी भरण्यापेक्षा कर्माने कपाळावर भाग्यरेखा उमटविण्याचे सामर्थ्य माणसाने मिळवले पाहिजे.

- कु. प्रगती मिसाळ - टी.वाय.बी.ए

## पर्यटनाचा ऐतिहासिक गोष्टींशी असलेला संबंध

मानवाला नेहमीच गतकाळातील ऐतिहासिक स्थळांबद्दल कुतुहल असते. ऐतिहासिक स्मारके, मंदिरे, राजवाडे, घरे, किल्ले, लेणी गुहा यांचे आकर्षण असते. मानवाची नैसर्गिक प्रवृत्ती असते. विविध ऐतिहासिक स्थळे, स्मारके, प्राचीन वास्तू पाहव्यात. त्या स्थळांची अधिकाधिक माहिती गोळा करणे.यासाठी अनेक हेतूंनी केलेला प्रवास म्हणजे पर्यटन होय.

अति प्राचीन काळापासून मानवाची सहज प्रवृत्ती आहे. विविध ऐतिहासिक स्थळांना भेट देणे. प्रवासाच्या दृष्टीने नियोजन करणे. नवीन प्रदेशाचा शोध घेणे. राजधान्या, बंदरे, व्यापारी बाजारपेठा यातून मानवी संस्कृतीचा विकास झाला आहे. आनंद मिळवण्यासाठी मनोरंजनासाठी प्रवास ही संकल्पना प्रथम युरोपातील रोमन लोकांना सुचली. रोमन साम्राज्याच्या काळात इजिप्तमधील पिरॅमिड्स, ग्रीसमधील अथेन्स तेथील नगरांची रचना,भव्य मंदिरे, मुर्ती क्रीडांगणे इ. पाहण्यासाठी लोक जात होते. इ.स. १९१७ ला औद्योगिक क्रांती इंग्लंड मध्ये घडून आली.. श्रीमंती वाढल्यामुळे मध्य वर्गातील लोकही पर्यटन क्षेत्राकडे आकर्षित झाले. विविध काळासाठी व विविध कारणासाठी प्राचीन काळापासून पर्यटनाची परंपरा चालत आलेली आहे. पर्यटनाचे स्वरुप हे परिवर्तनशील आहे. प्रारंभीच्या काळामध्ये पर्यटन हे श्रीमंतांपुरतेच मर्यादित होते. गेल्या काही दशकांपासून पर्यटनाचे लोकशाहीकरण झालेले आहे. विविध क्रीडा स्पर्धा यांमुळे पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे.

भारतीय इतिहास व संस्कृतीला हजारो वर्षांची परंपरा आहे. जगातील कोणत्याही देशापेक्षा भारतीय संस्कृती सर्वश्रेष्ठ आहे. राजवाडे, नद्या, मंदिरे, मस्जिद, समाधी, कबरी, नद्यांचे घाट इ. स्मारके आहेत. आग्रा, दिल्ली, काशी त्याचप्रमाणे खजुराहो, राजस्थानमधील किल्ले, राजवाडे तसेच भारतातील कोठेही न आढळणारे जंजीरा, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, रत्नसिंह, सुवर्णसिंह इ. किल्ले प्रसिद्ध आहेत.

रायगड, शिवनेरी, सिंहगड, देवगिरी इ. किल्ले शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेले आहेत. अशा ऐतिहासिक स्थळांना भेट देण्यासाठी पर्यटक आवर्जून येतात. पंढरपूर, कोल्हापूर, जेजुरी, शिर्डी, शेगाव, नाशिक, पैठण इ. धार्मिक ठिकाणी पर्यटक अवश्य भेट देतात.

पर्य़टन आणि इतिहास यांचे अतूट नाते आहे म्हणून इतिहासामध्ये पर्यटनाला महत्त्व आहे.

- कैथरिन क्षेत्रे,

एम.ए.इंग्रजी

दि प्रेस ॲण्ड रेजिस्ट्रेशन ऑफ बुक्स
नियम ८ फॉर्म नं. ९ नुसार
सदर वार्तापत्र हे खासगी वितरणासाठी असून स्वप्नील प्रिंटर्स यांचेकडून २०० अंक मुद्रित केले आहेत.
प्रकाशन हक्क : प्राचार्य डॉ. दिनानाथ पाटील,
मुद्रण : स्वप्नील प्रिंटर्स, अ.नगर ७२७६००५४०९